१

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण परिमंडळ, ठाणे

## परिपत्रक

**विषयः सन २०१६ मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचे बाबतची माहिती**

विषयांकित प्रकरणी, या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, सन २०१६ मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांची माहिती प्रपत्र-अ मध्ये व प्रपत्र-ब मधील माहिती प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत परिमंडळ, ठाणे व संबधीत मंडळ कार्यालयास सादर करावी.

तसेच असेही कळविण्यात येते की, सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांना सेवानिवृत्ती विषयक लाभ त्वरीत मिळतील, याकरीता निवृत्ती वेतन प्रकरणी म.ना.से.(निवृत्ती वेतन) नियम-१९८२ मधील नियम क्र.१२१(३) नुसार (२) अन्वये पोट नियम-१ च्या खंड-(अे)(बी)(सी) अन्वये संबंधीताकडून कगदपत्रांची पूर्तता करुन घेण्यात यावी व नियम क्र.१२३ मधील तरतुदीप्रमाणे ६ महिने अगोदर सेवानिवृत्तीचा प्रस्ताव मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा. त्याचप्रमाणे भ.नि.नि. नियमावली १९९८ मधील नियम क्र.२८(४) अन्वये ९०% / १०% भ.नि.नि.प्रस्तावाचे प्रकरणी आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करण्यात येऊन नियम क्र.२९(२) मधील तरतूदीनुसार प्रकरण मंजुरीसाठी वरिष्ठ कार्यालयास सादर करावे, जेणेकरुन सेवानिवृत्ती नंतर लगतच्या महिन्यात अधिकारी / कर्मचारी यांना निवृत्ती वेतन सुरु होऊ शकेल व भ.नि.निधी ची रक्कमही लगेचच अदा करता येईल. याबाबत संबंधीत कार्यालयातील कार्यकारी अभियंता जबाबदार राहतील.

अर्जित रजा रोखीकरण प्रकरणी आवश्यक सर्व बाबींची पूर्तता अधिकारी / कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापूर्वी एक महिना अगोदर पूर्ण करण्यात यावी व सेवानिवृत्तीच्या दिवशी संबंधितांस त्यांचे खाते शिल्लक असलेल्या अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम अदा करण्यात यावी. याकरीता संबंधीत कार्यालयाची निधी मागणी ही विहित मुदतीत करण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता यांची राहील. याकरीता सर्व कार्यकारी अभियंता यांनी वैयक्तिक लक्ष देऊन कार्यवाही करावी, अन्यथा संबंधीतांस जबाबदार धरण्यात येईल.

सोबत :- वरिलप्रमाणे

(मनिषा पलांडे)
अधीक्षक अभियंता
तथा परिमंडळीय अध्यक्ष

जा.क्र.मजीप्रापरिमं/ठाणे/ ४ /२०१६.
अधीक्षक अभियंता तथा परिमंडळीय अध्यक्ष,
म.जी.प्रा.परिमंडळ, ठाणे.
दिनांक : १३ जानेवारी २०१६.

प्रत- मुख्य अभियंता, म.जी.प्रा. ठाणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत- अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा.मंडळ, ठाणे / म.जी.प्रा.ज.व्य.मंडळ, पनवेल यांचे माहिती व कार्यवाहीस्तव.
प्रत- कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.विभाग, ठाणे / ज.व्य.विभाग, अंबरनाथ/ विरार/यांत्रिकी विभाग, ठाणे/ ज.व्य.वि.पनवेल/ माणगांव/ सिंधुदुर्ग नगरी/ रत्नागिरी यांना माहिती व कार्यवाहीस्तव.

D: Kadam/ Estt. Marathi/Page No.721 / 1.13.2016

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**

**प्रपत्र-ब**

**सन २०१६ मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचे निवृत्ती वेतन विषयक लाभांविषयीची माहिती दर्शविणारे विवरणपत्र**

| अ.क्र. | नांव व पदनाम | सेवानिवृत्तीचा दिनांक | निवृत्ती वेतन प्रकरण मध्यवती कार्यालयास सादर केल्याचा दिनांक | भ.नि.निधी चा प्रस्ताव | | | रजा रोखी करणाची रक्कम अदा केल्याचा दिनांक | गट विमा योजनेचा प्रस्ताव मध्यवर्ती कार्यालयास सादर केल्याचा दिनांक | निवृत्ती वेतन मंजुर झाल्याचा दिनांक | उपदान / अंश राशीकरण मंजुरीचा दिनांक | गट विमा योजनेची रक्कम मंजुर झाल्याचा दिनांक | शेरा - ज्या प्रकरणी मध्यवर्ती कार्यालयाकडून शेरे उपस्थित केले आहेत त्या प्रकरणी शेरे पूर्तता केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ९०% चा प्रस्ताव | १०% चा प्रस्ताव | १००% चा प्रस्ताव | | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

### सन २०१६ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांची माहिती

### प्रपत्र-अ

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचारी यांचे नांव | पदनाम | सेवापुस्तकातील दिनांक |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |